# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

## (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)

जा.क्र.2021/आ.व्य./Fire Equipment/कावि-

दिनांक.18 /06/2021

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर अंतर्गत लातूर जिल्हयात अग्निशमन यंत्र सामुग्री/ साहित्य पुरवठा करण्याकरिता ई-निविदा सुचना क्र. 2/2021-22**

अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, लातूर अंतर्गत अग्निशमन यंत्र सामुग्री/ साहित्य यामध्ये Fire Extinguisher Rrefilling तसेच नविन साहित्य खरेदी करणेसाठी पुरवठाधारक, नोंदणीकृत संस्था, उत्पादकधारक यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयलातूर यांचेमार्फत ई-निविदा प्रक्रियेसंबधीची माहिती खालीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे. सदरची ई-निविदा https://mahatenders.gov.in आणि लातूर जिल्हयाच्या http://latur.nic.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**कार्यवाहीचे टप्पे**

| | | |
|---|---|---|
| 1 | ई-निविदा अर्ज शुल्क | रु.2,000/- ऑनलाईन पध्दतीने सादर करणे. |
| 2 | बयाना अनामत (EMD) | रु.10,000/- ऑनलाईन पध्दतीने सादर करणे. |
| 3 | अटी व शर्तीसह वरील ई-निविदा मिळण्याचे ठिकाण. | https://www.mahatenders.gov.in |
| 4 | ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दिनांक. 21/06/2021 रोजी सकाळी 10:00 वा. |
| 5 | ई-निविदा पूर्व बैठक. (Pre Bid Meeting) | दिनांक. 23/06/2021 रोजी सकाळी 11:00 वा. |
| 6 | ई-निविदा ऑनलाईन भरण्याची दिनांक व वेळ. | दिनांक. 21/06/2021 रोजी सकाळी 11:00 वाजेपासून ते दिनांक. 25/06/2021 सायं. 05:00 वाजेपर्यंत. |
| 7 | ई-निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण. | दिनांक. 28/06/2021 रोजी सकाळी 11:00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर |

- ई-निविदा शुल्क म्हणून रु.2,000/- (रुपये दोन हजार फक्त) इतकी रक्कम ऑनलाईन पध्दतीने सादर करणे.
- बयाना अनामत (EMD) म्हणून रु.10,000/- (रुपये दहा हजार फक्त) इतकी रक्कम ऑनलाईन पध्दतीने सादर करणे.
- ई-निविदा पूर्व बैठक दि. 23/06/2021 रोजी सकाळी 11.00 वा. जिल्हाधिकारी कार्यालय, बार्शी रोड, लातूर येथे आयोजित केली आहे. या बैठकीत ई-निविदा संदर्भात काही प्रश्न/शंका असल्यास उपस्थित करावी.
- ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा पुर्ण अधिकार जिल्हाधिकारी, लातूर यांनी राखून ठेवला असून तो सर्वांवर बंधनकारक राहील. कोणतेही कारण न देता कोणत्याही स्तरावर कोणतीही ई-निविदा नाकारणे, स्वीकारणे किंवा अंशतः अथवा संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचे तसेच साहित्य पुरवठा आदेश एक किंवा अनेक निविदाधारकास वाटून देणे, इत्यादी सर्व अधिकार जिल्हाधिकारी लातूर यांचेकडे राखून ठेवले आहे.
- संपूर्ण ई-निविदा, अटी व शर्ती हे www.mahatenders.gov.in व www.latur.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे

( पृथ्वीराज बी.पी. ) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर

**ई-निविदा**

**अटी व शर्ती आणि परिशिष्ट**

- अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, लातूर अंतर्गत जिल्हयात अग्निशमन यंत्र सामुग्री/ साहित्य यामध्ये Fire Extinguisher Rrefilling तसेच नविन साहित्य करणेसाठी अधिकृत पुरवठाधारक, नोंदणीकृत संस्था, उत्पादकधारक यांचेकडून द्विलिफाफा पध्दतीने ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे.
- **शोध व बचाव साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे (दर एकत्रित (सर्व करांसहीत) सादर करावे)**

| Sr. No | Equipments Name | Specification | Estimated probable Rate for single Qnt. Rs. | Rate Quote for single Qnt. (including all taxes) |
|---|---|---|---|---|
| 1 | Fire Extinguisher ABC type | MAP stored pressure type fire extinguisher containing Mono Ammonium Phosphate which is applicable on all classes of fire, pressurized by dry Nitrogen Gas, The extinguisher should be provided with a magnetic pressure gauge as indicating system to know the readiness of the system. Approved as per ISI : 15683 (6 Kg) | 2400=00 | |
| 2 | Co2 Extinguisher Wheel Type | Model – FC-4.5, Capacity- 4.5 Kg, Filling Ratio – 0.667, Type of Extinguishing Media – Co2 Gas Conforming to IS:15222, Expellant- Self, Minimum Effective Discharge – 95 %, Minimum Throw – 2 Meters, Minimum Discharge Time – More than 8 in seconds, Operating Position – Upright, Operating Temperature Range – (-) 20 to (+) 55 in Celsius, Operating Vale – Wheel Type IS 3224, Fire Rating – 13 B | 6500=00 | |
| 3<br>4<br>5 | Fire Extinguisher Refilling (ABC Type) | ABC Powder Portable Fire Extinguisher 6 kg<br>Co2 Portable Fire Extinguisher 4.5 kg<br>Co2 Refilling with Hydraulic testing<br>Refilling 6 month warranty & Practical demo | 500=00<br>400= 00<br>1180=00 | |
| 6 | Fire Bucket Set | 9 Ltr Capacity, Red Colour Painted, Printed Fire on both side of bucket in white colour, Bottom handle, four bucket stand | 4000= 00 | |
| 7 | Fire Alarm System | Four 20 Panel, 10 Smock detector, 4 mcp / 4 hooters, 200 mtr 1.5 sq.mm 2 core flexible cable with patti fitting | 70000=00 | |
| 8 | Emergency sigh board | Acrylic sheet, Size 4x12 inch, thickness – 5 mm | 180=00 | |

**<u>अटी व शर्ती पुढीलप्रमाणे राहील :-</u>**

१) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर यांनी वरील दर्शविलेल्या तपशिलवार वर्णनाच्या साहित्याची खरेदी अ) वस्तुच्या उत्पादकधारकाकडून ब) त्यांचे अधिकृत वितरक क) पुरवठाधारक यांचेकडून निविदा मागवित आहेत.

२) ई-निविदा मा.जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांचे कार्यालयामध्ये संगणक प्रणालीद्वारे दिनांक १८/०६/२०२१ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत स्विकृत केलेल्या व अशा प्राप्त ई- निविदा दिनांक २१/०६/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. संगणक प्रणालीद्वारे उघडण्यात येतील. काही तांत्रिक अडचणी असल्यास त्याबाबत पुरवठादारांना सूचित करण्यात येईल तसेच निविदा उघण्याची तारीख व वेळ यात बदल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी लातूर यांनी राखून ठेवले आहेत.

३) साहित्यातील खरेदीची/रिफिलींग तरतुद कमी जास्त होवू शकते. त्यामुळे पुरवठा आदेश कमी जास्त होवू शकतो. तसेच कोणत्याही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क मा.जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर यांनी राखून ठेवला आहे.

**B) ई- निविदा तांत्रिक क्र. १ मधील आवश्यक कागदपत्रे**

**I) बयाना रक्कम बाबत -**

१) निविदाबाबत स्विकृती आदेश रवाना झाल्यानंतर निविदा चौकशी सोबत आलेल्या सर्व बयाना रक्कम त्वरीत परत करण्यात येतील.

२) निविदेत सहभागी निविदाकाराने प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

**II) तांत्रिक निविदा मध्ये खालील बाब क्र. १ ते ६ मध्ये दर्शविलेले कागदपत्रे Upload करण्यात यावे.**

१) निविदा धाकराने EMD - रु. १०,०००/- online debit card/credit card & Net banking याच विकल्पाने Pay करावे लागेल. सदर रक्कम जमा केल्याबाबतची पावती UTR नंबर सह.

२) मुंबई दुकाने अधिनियम १९४८ नुसार संस्थेच्या नोंदणीचा दाखला किंवा भागीदारी संस्था असल्यास त्याबाबतीत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे.

३) मागील तीन महिन्याचे जी.एस.टी. भरणा केल्याचे चलनाच्या प्रती

४) निविदेसोबत अटी व शर्ती असलेला नमुना स्वाक्षरी व शिक्का मारुन सोबत जोडावा

५) शासकीय / निमशासकीय कार्यालयास साहित्य पुरवठा केल्याचे आदेश / प्रमाणपत्र

६) पॅन, आधार कार्ड, जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत

७) मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र

**C) व्यापारी / दरासंबधिची ई निविदा क्र. २**

दरासंबधिचा निविदा हि विहीत केलेल्या ठिकाणी Upload करण्यात यावी.

आर्थिक निविदा BOQ मध्ये भरतेवेळेस निविदेसोबत जोडलेल्या साहित्याचा तपशिल पाहूनच भरावे.

१) वर उल्लेख केल्याप्रमाणे विविध बाबींसाठी अंदाजे एकूण रक्कम रु.१०,००,०००/- (रुपये दहा लक्ष मात्र) इतकी आहे. मात्र यात बदल होऊ शकतो.

२) दोन्ही तांत्रीक व दराची ई - निविदा https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर विहीत केलेल्या ठिकाणीच Upload करावी.

* निविदेतील अग्निशमन यंत्र सामुग्री/ साहित्याचे दर प्रत्येकी एका प्रती नग या प्रमाणे सर्व करासह भरावे, ज्या निविदाधारकांचे दर सर्वात कमी येईल त्यांना साहित्य पुरवठा करावयाची नगाची संख्या निश्चित करण्यात येईल.

**D) खरेदी प्रक्रियेशी संबंधित महत्वाचे नियम**

**Risk Purchase:**
The contractor fails to deliver the stores of any instalment thereof within the period fixed for such delivery or at any time repudiated the contract before the expiry of such period, the Government is entitled to cancel the contract and repurchase the stores not delivered at the risk and cost of the defaulting contractor. In the event of such a risk purchase, the defaulting contractor shall be liable for any loss which the Government may sustain on that account provide the purchase, or if there is an agreement to purchase, such agreement is made, in case of default to deliver the stores by the stipulated delivery period, within six months from the date of such default and in case of repudiation of the contract before the expiry of the aforesaid delivery, within six months from the date of cancellation of the contract.

**Force Majeure Clause:**
If, at any time, during the continuance of this contract the performance in whole or in part by obligation under this contract shall be prevented of delayed by reason of any war, hostility, acts of the public enemy, civil commotion, sabotage, fires, floods, explosions, epidemics, quarantine restriction, strikes, lock-outs or acts of God (hereinafter referred to as events") provide notice of happening of any such eventuality is given by either part to the other within 21 days from the date of occurrence thereof, neither party shall by reason of such event, be entitled to terminate this contract nor shall either party have any claim for damages against the other in respect of such non-performance of delay in performance; and deliveries under the contract shall be resumed as soon as practicable after such event has come to an end or ceased to exist. and the decision of the purchasing officer as to whether the deliveries have been so resumed or not, shall be final conclusive, provided further that if the performance in whole or part of any obligation under this contract is prevented or delayed by reason of any such event for a period exceeding 60 days, either party may at its option terminate the contract PROVIDED ALSO that it the contract is terminated under this clause, the purchaser shall be at liberty take over from the contract at a price to be fixed by the purchasing officer which shall be final all unused, undamaged and acceptable materials, bought out components and stores in course of manufacture in the possession of the contractor at the time of such termination or such portion there of as the purchaser may deem fit accepting such material, bought out components and stores as the contractor may with the concurrence of the purchaser elect to retain.

**Important factors relating to placement of contracts Force Majeure Clause-** The force Majeure clause in the following form only (which will not form part of the general conditions of contracts) should be included in such contracts where the suppliers specifically insists on the provision of a force majeure clause and there is no alternative but to accept the same. This clause should not be incorporated in the Invitation to Tender, but prior to acceptance of an offer in such a case the supplier should be asked to accept this clause as governing conditions of force majeure.

**E) प्रदान (पेमेंट)**

१) खरेदी केलेल्या साहित्याचे प्रदान साहित्याचा पुरवठा संबंधित प्राधिका-यांना केल्यावर व पुरवठा केलेल्या साहित्याची तांत्रीक तपासणी सक्षम यंत्रणेकडून करुन निविदेतील वर्णनानुसार साहित्य चांगल्या प्रतिचे असल्याचे खात्री झालेनंतर देयकाची अदायी करण्यात येईल. आयकर निपटारा प्रमाणपत्र देयकासोबत सादर न केल्यास शासन नियमानूसार देयकातून आयकर कपात करण्यात येईल.

**F) साहित्य पुरवठयाच्या अटी व शर्ती**

१) साहित्याचा पुरवठा आदेशात नमुद मुदतीत व कालावधीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर जिल्हाधिकारी कार्यालय लातूर किंवा जिल्हा कार्यक्षेत्रातील विभागांमध्ये करणे आवश्यक आहे.

२) साहित्याचे स्विकृतीचे वेळ ही कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपावेतो आशी राहिल आणि त्याचे कालावधीत स्विकृत केले जाईल. पुरवठाधारकाने पुरवठा करावयाचे साहित्य स्वतःच्या खर्चाने, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे किंवा जिल्हा कार्यक्षेत्रातील विभागांमध्ये करणे आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापन शाखेत पोहच घ्यावी लागेल.

३) साहित्याची गुणवत्ता या निविदा फॉर्ममध्ये दिलेल्या Specification वर्णनानुसार आवश्यक आहे या नुसार नसलेले साहित्य स्विकृत केले जाणार नाहीत.

४) पुरवठाचा कालावधी हा पुरवठा आदेशातील विहीत मुदतीत करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

५) पुरवठा केलेल्या साहित्याचे हाताळणी प्रशिक्षण देणे बंधनकार राहील.

६) निविदाधारकाने नमुद केलेले दर सर्व करासहीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागात पोहचपर्यंतचे देण्यात यावेत.

**G) विलंबाने पुरवठा**

१) जर पुरवठाधारकाने विहित कालावधीमध्ये पुरवठा केला नाही तर पुरवठा करणे बाकी असलेल्या साहित्याच्या निविदा किंमतीच्या अर्धा टक्के प्रति आठवडा या दराने दंड आकारण्यास मा.जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर हे समक्ष राहतील. तसेच मुदतवाढ देण्याचा हक्क मा जिल्हाधिकारी, लातूर यांनी राखून ठेवला असून तो निर्णय निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

२) पुरवठादारने साहित्य पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यास किंवा पुरवठाधाकराने साहित्याचा पुरवठा विहित कालावधीत केला नाही तर अथवा पुरवठाधारकाने पुरवठा केलेल्या साहित्यातील काही साहित्य अस्विकृत झाले असल्यास असे अस्विकृत साहित्य विहित मुदतीत बदलून दिले नाही तर मा.जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर हे त्यांना योग्य वाटेल अशा निविदातील कोणत्याही पुरवठाधारकाकडून मान्य केलेल्या दरावर उर्वरित साहित्य खरेदी करण्यास सक्षम राहतील. जादा येणार खर्च पुरवठा धारकाडून वसूल करण्यात येईल.

३) जेव्हा उपरोक्त क्र. २ मध्ये नमुद केलेली कार्यवाही अंमलात आणली जाईल तेव्हा कसुरदास पुरवठाधाकांचे पुरवठा करण्याची तयारी विचारात घेतली जाणार नाही. कसुरदार पुरवठाधारकांस दोन्ही दरामधील किंमतीच्या फरक अथवा १० टक्के या दोन्हीपैकी जी जास्त रक्कम असेल तेवढी रक्कम पुरवठाधारकाकडून वसूलपात्र राहिल. जर कसुरदार पुरवठाधारकाने रक्कमेचा भरणा केला नाहीतर, त्याची सुरक्षा अनामत जप्त करुन त्यांचे नांव काळया यादीत समाविष्ट केले जाईल.

**H) आवश्यक सूचना:-**

१) सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२) ज्या निविदेमध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरामध्ये संदिगधता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल जर अक्षरी व अंकी दरामध्ये तफावत असल्यास दोन्ही पैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल नमुद दरात खाडाखोड असल्यास त्याठिकाणी निविदाधारकाने स्वाक्षरी व शिक्का मारने आवश्यक आहे.

३) निविदाधारकांचे सादर केलेले निविदेतील दर हे पुरवठा आदेशाच्या तारखेपासून एक वर्षापर्यंत बंधनकारक राहातील. जे साहित्य वर्णनावर हुकुम नसेल अथवा स्विकारण्याजोगे नसेल असे कोणतेही साहित्य स्विकृत केले जाणार नाही व त्याबाबत कोणतीही जबाबदारी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर घेणार नाही.

४) ज्या निविदाधारकांची निविदा स्विकृत करण्यात येईल अशा निविदाधारकांस १००/- रु. किंमतीच्या स्टॅमपवर करारनामा करुन दयावा लागेल वरील अटी व शर्तीचा या करारनामन्यामध्ये समावेश राहिल तथापि करारनामा करतेवेळी या अटी मध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर यांनी राखून ठेवला आहे.

५) निविदा धारकाने टाळाटाळ किंवा बेशिस्त वर्तन केल्यास त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येवून योग्य ती कारवाई केली जाईल. या निविदेतील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास मा.जिल्हाधिकारी, तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर यांचा निर्णय अंतिम राहिल.

६) साहित्याची गॅरन्टी एक वर्षापर्यंतची असेल तसे करारपत्र १००/- रु. स्टॅम्पपेपरवर दिल्यानंतरच पुरवठा आदेश देण्यात येईल.

७) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर यांनी मागणी केलेले साहित्य त्यांनी निर्देशित केलेल्या ठिकाणी पुरवठा केल्याची व ते सुस्थितीत प्राप्त झाल्याची पोहोच पावती मा.जिल्हाधिकारी, तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर यांचेकडे पुरवठादाराने सादर करावे. पोहोच पावती प्राप्त झाल्यानंतर त्याची योग्य ती तपासणी सक्षम यंत्रणेकडून करुन मा.जिल्हाधिकारी, तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर हे देय रक्कम पुरवठादारास अदा करतील.

८) साहित्याचा पुरवठा करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या कोणत्याही प्रकारची तुट येणे, गुणवत्तेपेक्षा कमी प्रतिचा माल देणे निर्धारित करुन दिलेल्या वेळेत सदर मालाचा पुरवठा न होणे, इत्यादी समस्या निर्माण झाल्यास पुरवठा करणारे संबंधित पुरवठादार हे सर्वस्वी जबाबदार राहतील. संबंधितांच्या तपासणीनुसार उतरवून दिलेले साहित्य हे कमी दर्जाचे किंवा खराब असतील किंवा मोजमापानूसार नसतील तर असे साहित्य पुरवठाधारकास कळविल्यापासून साहित्याचा पुरवठा १५ दिवसाचे आत करण्याची जबाबदारी संबंधीत पुरवठादारांची राहिल अन्यथा पुरवठादार वसूलीस व दंडात्मक कारवाईस पात्र राहील.
९) दिलेल्या निविदेतील दरांना मा.जिल्हाधिकारी यांनी मंजूरी दिल्यानंतरच व साहित्य पुरविण्याबाबतचे या कार्यालयाचे लेखी पत्राद्वारे कळविलेनंतरच साहित्याचा पुरवठा करावा.
१०) नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य कोणत्याही कारणांमुळे वाहतुकीस खोळंबा झाल्यास त्याचे कसलेही भाडे दिले जाणार नाही.
११) निविदाधारकाचे दर मान्य करण्यात आल्यानंतर शासन नियमानूसार तीन टक्के (३ %) सुरक्षा अनामत रक्कम भरणा केल्यानंतर तसेच करारपत्र करुन दिलेनंतर पुरवठा आदेश देण्यात येईल.
१२) एकूण खर्च नमुद करतांना सर्व करासह नमुद करावा. सोबत आयएसआय (ISI) स्पेसिफिकेशन नमुद करावे.
१३) कोणत्याही प्रकारची अॅडव्हान्स / आगाऊ रक्कम पुरवठादारकास दिली जाणार नाही.
१४) वर नमुद केलेल्या कोणत्याही अथवा सर्व अटीचा अथवा नियमांचा अर्थ लावण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर यांना राहिल.
टिप- वरील प्रमाणे अटी व शर्ती मी वाचल्या आसुन त्या मला मान्य आहेत.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, लातूर**